शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २४३ । शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

### मुख्य सचिव राजेश कुमार यांना मुदतवाढ

**मुंबई ।** राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. केंद्रीय कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने शुक्रवारी याबाबतची माहिती राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाला दिली. त्यामुळे राजेश कुमार आणखी तीन महिने पदावर राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील १९८८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी असलेल्या राजेश कुमार हे नियत वयोमानानुसार येत्या ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होणार होते. निवृत्तीला दोन दिवस बाकी असताना त्यांना मुदतवाढ मिळाली आहे.

### दगडफेक, गाड्या फोडल्या, तुफान राडा

**पाटणा ।** विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे बिहारमध्ये वोट अधिकार यात्रा काढत असताना दुसरीकडे भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेस कार्यालयावर हल्ला केल्याची घटना घडली. काँग्रेसच्या सभेत मोदी यांच्या दिवंगत आईबद्दल अपशब्द काढल्याच्या वादातून हा तुफान राडा झाला. काँग्रेस कार्यालयाच्या आवारात असलेल्या वाहनांची तोडफोड झाली असल्याचे काँग्रेसने म्हटले. बिहारमध्ये राहुल गांधी यांच्या सुरू असलेल्या वोट अधिकार यात्रेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या आई यांच्याविरुद्ध अपमानास्पद टिप्पणी केल्याचे प्रकरण आता अधिकच तीव्र होत आहे.

## संपादकीय

### भेटीगाठी ही तर संस्कृती...

‘अतिथी देवो भव’ ही मराठी मुलखाची संस्कृती. त्यामुळेच दहा दिवसांसाठी पाहुण्या आलेल्या गणपतीबाप्पांचे स्वागत मोठ्या दणक्यात झाले. उद्या घरोघरी गौरींचे आगमन होईल. बाप्पा परत जातील तरी स्वागताचा माहोल काही दिवस कायमच राहील. सणासुदीच्या दिवसात एकमेकांच्या घरी जाणे, भेटीगाठी घेणे, स्वागताचा आनंद लुटणे ही परंपराच आहे. लोक परस्परांना आग्रहाचे आमंत्रण देतात. लोक जाताताही. यामुळे नव्याने ऋणानुबंध रुजतात. रुजलेले अधिक घट्ट होतात. मैत्रीचे धागे जुळतात. मग राजकारण्यांच्या भेटीगाठींची इतकी चर्चा लोक का करतात? राजकारणी एखाद्या ग्रहावरून आलेले असतात, असे लोकांना वाटते का? त्यापैकी अनेक जण प्रभावी नेते असतील. त्यांच्यामागे लाखो कार्यकर्ते असतील. त्यांच्या सर्व प्रकारच्या श्रीमंतीने लोकांचे डोळे दीपतही असतील. पण नेते कधी ना कधी सामान्य माणूसच होते हे लोक कसे विसरतात? त्या अर्थाने परंपरा आणि संस्कृती ते कसे विसरू शकतील? अजित पवारांनी देखील नुकतेच ते ठणकावून सांगितले. राजकीय भेटीगाठी ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. उगाच त्यातून अर्थ काढू नका, असे बजावले. राजकीय नेत्यांमागे कार्यकर्त्यांचा गोतावळा असतो. त्यांनाही नातेवाईक आणि मित्र असतात. सार्वजनिक सणांच्या काळात तेही नेत्यांना त्या नात्याने आमंत्रण देतात. मग राजकारण्यांनी जायला नको? चार लोक भेटले की सुखदुःखाच्या गोष्टी होतात. भावनांचे आदानप्रदान होते. परस्परांची ख्यालीखुशाली विचारली जातेच की. सर्वांचे सर्वांशी सारखेच पटते असे कधी घडते का? कोणी अधिक जवळचा तर एखादा जिवाभावाचा असतो. काही लाडके आणि काही दोडके असायचेच प्रत्येकाचे. नेत्यांचेही तसेच असते की. मग राजकीय भेटीगाठींमागे नेहमीच संशयकल्लोळ असतो असे लोकांना का वाटत असू शकेल? अर्थात, आवळा देऊन कोहळा काढणे ही नेत्यांची खासियत असते. बुद्धिबळाचा खेळाडू कोणतीही चाल निरुद्देश रचत नाही. नेत्यांना लोक कसलेले खेळाडूच मानतात. कोणतीही भेट ते निरुद्देश घेणार नाहीत हे लोकांना

पान २ वर »

# आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करु नका : मुख्यमंत्र्यांचा विरोधकांना इशारा

**मुंबई ।** मराठा समाजाच्या मागणीवर राज्य सरकार सकारात्मक आहे. या मागण्यांबाबत सरकार मराठा समाजाच्या पाठीशी आहे. परंतु, काही लोकांकडून मराठा आणि ओबीसी समाजात भांडण लावण्याचा प्रयत्न सुरु आहे. मात्र, अशाप्रकारे आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका. यातून तुमचे तोंड भाजेल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विरोधकांना दिला. त्याचवेळी त्यांनी मराठा समाजाच्या मागणीवर कायदेशीर भूमिका घेण्याचे आवाहन विरोधी पक्षाला केले. मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा समाज मुंबईत एकवटला आहे. आंदोलकांनी



आझाद मैदानात आंदोलन सुरु करताना काही आंदोलकांनी मंत्रालय परिसरात जमून जोरदार घोषणाबाजी केली. या पार्श्वभूमीवर आज प्रसार माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी मराठा आंदोलनावरून विरोधकांना चांगलेच सुनावले. एखाद्या निर्णयाचा परिणाम दीर्घकाळ असतो. त्यामुळे असे निर्णय सर्वसमावेशक आणि चर्चेतून घ्यायचे असतात. लोकांना एकमेकांसमोर झुंजवणे आणि प्यादे लढवणे हे या सरकारचे धोरण नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. सध्या वेगवेगळे पक्ष यासंदर्भात सोयीची भूमिका घेत आहेत. त्या पक्षांना माझे आवाहन आहे की वेगवेगळी भूमिका घेऊ नका. भूमिका घ्यायची असेल तर ठाम भूमिका घ्या. मात्र, हे पक्ष ठाम भूमिका घेताना दिसत नाहीत. विरोधी पक्ष मराठा आरक्षणावर कायदेशीर भूमिका सांगणार नाहीत. कारण त्यांना समाजासमाजात भांडण होताना कुठेतरी राजकीय फायद्याचा वास येतो. आम्हाला राजकीय फायदा करून घ्यायचा नाही. आम्हाला सगळे समाज सांभाळायचे आहेत, असे फडणवीस म्हणाले.

**आंदोलनातून मार्ग काढू!**

मराठा आंदोलकांच्या मागण्यांवर आम्ही मार्ग काढू. राज्य सरकारने यापूर्वीच मंत्रिमंडळाची उपसमिती नेमली आहे. या उपसमितीकडे आम्ही काही मागण्या पाठवल्या आहेत.यावर समिती विचार करत आहे. मराठा समाजाला केवळ आश्वासन देऊन चालणार नाही तर त्यातून कायदेशीर आणि संविधानात बसणारे मार्ग काढावे लागतील. हा मार्ग कसा काढता येईल यासाठी आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत दोन समाज एकमेकांच्या समोर उभे राहिले आहेत, अशी परिस्थिती महाराष्ट्रात उभी राहू नये. सरकारला ओबीसी समाजालाही सांभाळावे लागेल आणि मराठा समाजालाही न्याय द्यावा लागेल. गेल्या १० वर्षात मराठा समाजाला आमच्याच काळात न्याय मिळाला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम आम्ही केले. मराठा समाजाला शिक्षण आणि रोजगाराच्या योजना आमच्या सरकराने सुरु केल्याचे फडणवीस म्हणाले. मराठा आंदोलनाच्या संदर्भात राज्य सरकारची भूमिका सहकार्याची आहे. लोकशाही पद्धतीने एखादे आंदोलन चालणार असेल तर त्याला कुठलीच मनाई नाही. लोकशाहीत चर्चेतून प्रश्न सोडवायचे असतात. आंदोलन हा त्याचा एक मार्ग असतो. उच्च न्यायालयाने जे आदेश दिले आहेत, त्यानुसार आंदोलनाला सहकार्य केले जात असल्याने आंदोलकांनी आडमुठेपणाने वागू नये, असे आवाहनही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

### आंदोलनाला एका दिवसाची मुदतवाढ

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला सुरुवात केली आहे. याआधी या आंदोलनासाठी आज संध्याकाळी ६ वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली होती, मात्र आता आणखी एका दिवसासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. परवानगीसाठी अर्ज मिळाला आहे आणि त्यावर विचार करुन हा निर्णय घेण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आधी केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. मात्र जरांगे पाटील यांनी आमच्या सर्व मागण्या या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत आम्ही मुंबई सोडणार नाही असे विधान केले होते. त्यानंतर आंदोलन सुरु केले आहे.

### उद्धव ठाकरेंचा पाठिंबा

मराठा समाजाच्या आंदोलनाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिला असून गतवेळी दिलेल्या आश्वासनांचे काय झाले? असे म्हणत त्यांनी एकनाथ शिंदे यांना टोला लगावला. राज्यातील सरकार समाजा-समाजात भांडणे लावण्याचे काम करीत असून या सरकारला अशांतता पसरवायची आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबत निर्णय घेत नाहीत. मराठा समाजाला आजपर्यंत न्याय मिळालेला नाही. म्हणूनच मनोज जरांगे-पाटील मुंबईत पोहोचले असून आंदोलकांची जबाबदारी सरकारने घ्यावी व त्यांना योग्य तो न्याय द्यावा, अशी मागणीदेखील माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांकडे केली आहे.







# जरांगेंचा जोर वाढला!

## आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरु

**मुंबई ।** राज्य सरकारने मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठ्यांचे मन जिंकायची ही आयती संधी आहे. मुख्यमंत्र्यांनी मराठ्यांच्या नाराजीची लाट अंगावर घेऊ नये. मला आणि माझ्या समाजाला फक्त आरक्षण पाहिजे. पण सरकार जर त्याचे राजकारण करणार असेल तर तुम्ही मला गोळ्या घातल्या तरी मी मागे हटणार नाही. सरकारने मला तुरुंगात टाकले तर मी तुरुंगातही उपोषण करेन. पण मराठ्यांच्या डोक्यावर गुलाल टाकल्याशिवाय मागे हटणार नाही, असा ठाम निर्धार मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी आज सकाळपासून आझाद मैदानात बेमुदत उपोषण सुरु केले. यादरम्यान उपस्थित जनसमुदायासमोर बोलताना जरांगे आरक्षण घेतल्याशिवाय मागे न हटण्याचा आपला निर्धार बोलून दाखवला. राज्य सरकारने आपल्याला सहकार्य केले आहे. आता आपणही सरकारला सहकार्य करावे. समाजाला खाली मान घालावी लागेल, असे वागू नका. मी समाजासाठी मैदानात आलो आहे.

### पावसामुळे आंदोलकांची तारांबळ

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरातून मुंबईत दाखल झालेल्या आंदोलकांची पावसामुळे मोठी तारांबळ उडाली. आज दिवसभर पावसाची रिपरिप सुरु होती. आझाद मैदानात आंदोलकांना बसण्यासाठी पुरेशी मंडप व्यवस्था नसल्याने आंदोलकांवर पावसात भिजण्याची वेळ आली. पाऊस सुरु असतानाही आंदोलक भर पावसातच आंदोलनस्थळी ठाण मांडून बसले होते.

### विविध नेत्यांनी घेतली जरांगेंची भेट

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी सुरु केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून लाखो मराठे मुंबईत झाले आहेत. त्याचबरोबर विविध पक्षाच्या राजकीय नेत्यांनीही जरांगे यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विजयसिंह पंडित, प्रकाश सोळुंके, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनावणे, निलेश लंके, आमदार संदीप क्षीरसागर, अभिजित पाटील यांच्यासह विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे.

### आंदोलक उतरले रस्त्यावर

जरांगे यांच्या आवाहनानुसार आझाद मैदानावरील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातील आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. मात्र प्रत्यक्षात आझाद मैदानावर सहा ते सात हजार लोकांना बसण्याची जागा असल्याने बाकी आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच मुंबई महापालिकेच्या बाहेरील चौकात ठिय्या मांडला. त्यानंतर हुतात्मा चौक, गेट वे ऑफ इंडिया, चर्चगेट, मंत्रालय, मरीन ड्राईव्ह परिसरात हे आंदोलक मोठ्या जमावाने फिरत राहिले. तर मंत्रालय, हुतात्मा चौकात या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. या आंदोलकांना पोलिसांनी अडवून, चर्चा करून वाहतुकीचा मार्ग पूर्ववत केला.

### ॲड.गुणरत्न सदावर्ते यांनी केली तक्रार

गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांना मुंबईत आंदोलनाला परवानगी देऊ नये, अशी मागणी याआधी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा सदावर्ते यांनी कायद्याचा आधार घेत जरांगे यांच्याविरोधात दंड थोपडले आहेत. जरांगे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेअंतर्गत तसेच मुंबई पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. विशेष म्हणजे सदावर्ते यांनी जरांगे यांच्याविरोधात ऑनलाईन पद्धतीने एक तक्रारही दाखल केली आहे. मनोज जरांगे यांना यांना २९ ऑगस्ट रोजी फक्त सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच आंदोलन करण्याची परवानगी होती.

### आरक्षण देण्यास राजकीय इच्छाशक्तीचा अभाव-सपकाळ

मराठा आरक्षण देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती लागते आणि तीच भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाही. हा आजचा प्रश्न नसून अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे. मराठा समाजाला दिलेले आरक्षण भाजप सरकारने सर्वोच्च न्यायालयात इम्पिरिकल डेटा दिला नाही म्हणून गेले, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी येथे केली. मला सत्ता द्या सात दिवसात मराठा आरक्षण देतो, अशी वल्गना करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेच काय झाले? असा संतप्त सवाल करत भाजप सरकारला आरक्षणाच्या नावाखाली फक्त मराठा आणि ओबीसी समाजात भांडणे लावायची आहेत, असा आरोपही सपकाळ यांनी केला.

# महाराष्ट्रात ३३ हजार नवीन नोकऱ्या येणार!

## नाशिक, नंदुरबारला उभे राहणार उद्योग

**मुंबई ।** आज राज्यामध्ये गुंतवणूकी संदर्भात १७ करार आपण केले. या १७ कराराच्या माध्यमातून जवळपास ३४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. जवळपास ३३ हजार नवीन रोजगारांची महाराष्ट्रात निर्मिती होईल अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हे जे करार झाले आहेत, त्यातले पाच करार हे उत्तर महाराष्ट्रातील आहेत, ९८६६ कोटी रुपयांचे हे करार आहेत, यात नाशिकमध्ये, अहिल्यानगर, नंदुरबार येथे गुंतवणूक होणार आहे अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पाच करार पुणे विभागाचे आहेत, यात ११,९६६ कोटींची गुंतवणूक आहे. ६ करार विदर्भाबाबत आहेत. यात ११६४२ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूरमध्ये ही गुंतवणूक होणार आहे. ३००० कोटीची गुंतवणूक रायगडमध्ये आहे, त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या नवीन करारामध्ये आदिवासी बहुल नंदुरबार जिल्ह्याला प्राधान्य देण्यात येणार असून त्यासोबतच नाशिक जिल्ह्यातदेखील मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



### हा महाराष्ट्रावरचा विश्वास

वेगवेळ्या सेक्टरमध्ये ही गुंतवणूक येत आहे. इलेक्ट्रीक बस, ट्रक आहे इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, सोलर मॉड्यूल आहे. इतरही काही वेगवेगळ्या पद्धतीची गुंतवणूक येत आहे. महाराष्ट्र सरकारच्या ज्या काही विकसिनशील योजना आहेत, टॅरिफ वॉर सुरु असताना महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणं, हा महाराष्ट्रावरचा विश्वास आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. उद्योग विभागाच्या माध्यमातून मैत्री पोर्टल तयार करुन उद्योजकांना डिजिटल अनुभव दिला. पुढे देखील अशीच गुंतवणूक पहायला मिळेल असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# कार विहिरीत पडली, पाच जण ठार

**जालना ।**जाफराबादतालुक्यात एक भीषण अपघात झाला आहे. या अपघातात पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. जाफराबाद-राजूर रस्त्यावर असलेल्या गाडेगव्हाण फाट्याजवळ एक कार विहिरीत कोसळली. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे जालना जिल्ह्याला हादरा बसला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

जालनाच्या जाफराबाद-राजूर रस्त्यावरील गाडेगव्हाण फाट्याजवळ एक कार विहिरीत कोसळली. भोकरदन तालुक्यातील कोपरडा गावातून हे सर्व जण छत्रपती संभाजीनगर येथील सुलतानपूरकडे निघाले होते. यावेळी एका रुग्णाला उपचारासाठी घेऊन जात असताना पहाटे ५ ते ६ च्या सुमारास



चालकाचे नियंत्रण सुटले. भरधाव वेगाने येणाऱ्या कारने रस्त्यालगत मॉर्निंग वॉक करणाऱ्या एका व्यक्तीला धडक दिली. त्यानंतर ती कार थेट विहिरीचा कठडा तोडून सुमारे ७० फूट खोल विहिरीत कोसळली.

या विहिरीमध्ये सुमारे ६० फूट पाणी होते. त्यामुळे कारमधील पाचही जणांचा बुडून मृत्यू झाला.





### केळी भाव

नवती (१) : 1475
नवती (२) : 1275

### मिश्कीली







cmyk